भिक्षेकऱ्यांच्या पुनर्वसनासाठी महाराष्ट्र राज्यात अस्तित्वात असलेल्या भिक्षेकरी गृहांच्या नावात बदल करणे बाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र. भिप्रशा-२०१९/ प्र.क्र.१५/का-९
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक- २३ जुलै, २०१९

<u>वाचा</u>- १. Hon॰ble Supreme Court Writ Petition (Civil) No. ११५१/२०१७ Vidhi /Centre for Legal Policy V/s. Union of India & Ors. (Petition regarding gross violation of the fundamental rights of persons affected by Leprosy) या प्रकरणात दिलेले निर्देश

२. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, भिक्षा प्रतिबंध शाखा यांचे पत्र क्र मबाविआ/भिप्रशा/कार्या-८/ पअताने/ १८-१९/९०९, दि. १३ फेब्रुवारी, २०१९

<u>प्रस्तावना :-</u>

मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल Writ Petition (Civil) No. ११५१/२०१७ Vidhi /Centre for Legal Policy V/s. Union of India & Ors. (Petition regarding gross violation of the fundamental rights of persons affected by Leprosy) या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी दि. १०.०९.२०१८ रोजीच्या आदेशामध्ये कुष्ठरोग्यांप्रती कोणत्याही प्रकारचे भेदभाव होणार नाही याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी असे निर्देश दिले होते.

२. महिला व बाल विकास विभागांतर्गत राज्यात भिक्षेक-यांसाठी कार्यरत असलेल्या (१) शासकीय कुष्ठधाम, केडगाव, ता. करमाळा, जिल्हा सोलापूर. (२) शासकीय कुष्ठरोगी भिक्षेकरी गृह, पुईकोलाड, ता. रोहा, जिल्हा रायगड या दोन संस्थांच्या शासन दस्तावेजांमध्ये असलेल्या नावावरुन सदर नावे कुष्ठरोग्यांप्रती भेदभाव करणारी असल्याचे दर्शवित होती.

३. तथापि सदर संस्थांच्या नावामध्ये कुष्ठधाम/ कुष्ठरोगी भिक्षेकरी गृह या शब्दाचा समावेश असला तरी कुष्ठरोगग्रस्त भिक्षेक-यांसोबत इतर भिक्षेकऱ्यांना देखील सदर भिक्षेकरी गृहात प्रवेश दिला जात असून, सद्यस्थितीत या दोन्ही संस्था केवळ भिक्षेकऱ्यांसाठीच असून त्यामध्ये दाखल होणाऱ्या भिक्षेकऱ्यांप्रती कुष्ठरोगी किंवा इतर कोणत्याही प्रकारे भेदभाव करण्यात येत नाही. सबब सदर दोन्ही संस्थांच्या शासन दस्तावेजांमधील नावांमध्ये बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

महिला व बाल विकास विभांगातर्गत कार्यरत असेलल्या खालील दोन भिक्षेकरी गृह संस्थांच्या नावात पुढीलप्रमाणे बदल करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

अनु क्र	सध्या असलेले नाव	बदल केलेले नाव
१.	शासकीय कुष्ठधाम, केडगाव, ता. करमाळा, जिल्हा सोलापूर Government Leprosy Home, Kedgaon, Taluka Karmala, District Solapur	शासकीय भिक्षेकरी गृह (पुरुष), केडगाव, ता. करमाळा, जिल्हा सोलापूर Government Beggers Home (Male) Kedgaon, Taluka Karmala, District Solapur.
२.	शासकीय कुष्ठरोगी भिक्षेकरी गृह, पुईकोलाड, ता.रोहा, जिल्हा रायगड Government Leprosy Affected Beggers Home, Pui-Kolad, Taluka Roha, District Raigad	शासकीय भिक्षेकरी गृह (पुरुष), पुईकोलाड, ता. रोहा, जिल्हा रायगड Government Beggers Home (Male) Pui-Kolad, Taluka Roha, District Raigad

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०७२३१७०७३७६१३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KHADIJA FAROOQUE NAIKWADE

Digitally signed by KHADIJA FAROOQUE NAIKWADE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=8cd35f5dfe17a9e9a0cd531b6bb11d782183e791bc817e7a736def213ac7d71b, postalCode=400032,
street=MANTRALAYA,MUMBA, ou=WOMEN AND CHILD DEVLOPMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA,
cn=KHADIJA FAROOQUE NAIKWADE
Date: 2019.07.23 17:17:21 +05'30'

(खदीजा नाईकवाडे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर.
२. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर.
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
५. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (आयुक्तालया मार्फत)
७. कक्ष अधिकारी (का-४), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. निवड नस्ती (का-९)